# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

# राजे शिवछत्रपती कुल क्रमांक-१

## “सांस्कृतिक कार्यक्रम”

## अहवाल

---

**दिनांक – १२ डिसेंबर, २०२५**

**स्थळ- सरस्वती कक्ष**

**शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे दिनांक-१२ डिसेंबर, २०२५ रोजी राजे शिवछत्रपती कुल क्रमांक-१ तसेच चक्रवती सम्राट अशोक कुल क्रमांक-२ या दोन्ही कुलांचा सांस्कृतिक कार्यक्रम संयुक्तपणे उत्साह पूर्ण आणि आनंददायी वातावरणात साजरा झाला. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या ज्येष्ठ प्राध्यापिका मा. प्रा. बिजली दडपे मॅडम व मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे मॅडम या दोन्ही कुलांच्या मार्गदर्शक यांच्या आयोजनाखाली झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या मा. डॉ. रमा भोसले मॅडम होत्या. या कार्यक्रमामध्ये प्रथम वर्षीय दोन्ही कुलांमधील छात्राध्यापकांनी**

मोठ्या उत्साहाने उपस्थिती दाखवून सहभाग घेतला होता. तसेच द्‌वितीय वर्षाचे छात्राध्यापक प्रेक्षक म्हणून उपस्थित होते. या सर्वांच्या उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम खूप सुंदर, उत्कृष्ट, नियोजनबद्‌ध आणि यशस्वीरित्या संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात ही महाविद्‌यालयाच्या प्राचार्या मा. डॉ. रमा भोसले मॅडम तसेच सर्व प्राध्यापकांच्या हस्ते दीप प्रज्वलन, सरस्वती पूजन व नटराजांच्या मूर्तीचे पूजन करून झाली. डिजिटल युगात नव्या पद्‌धतीने त्यांनी दोन्ही कुलाच्या पोस्टरचे डिजिटल पद्‌धतीने उद्‌घाटन केले. सर्वप्रथम राजे शिवछत्रपती कुल क्रमांक-१ यांचा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. या कुलाने "महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा" या विषयावर अतिशय उत्कृष्टरित्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमामध्ये त्यांनी विविध विषयांवर आधारित नृत्य आणि गीत सादर करून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेवर आधारित एक अनोखा देखावा सादर केला.

या कुलाने महाराष्ट्रीयन संस्कृतीप्रमाणे सर्वप्रथम श्री गणेशांची वंदना सादर करून या शुभ कार्याचा प्रारंभ केला. त्यानंतर विविध संस्कृतीचे नृत्य जसे की, कोळी नृत्य, लावणी, गवळण, गोंधळ तसेच आदिवासी संस्कृतीचे प्रतिक असलेलं तारपा नृत्य सादर केलं. त्याचबरोबर कार्यक्रमामध्ये विरंगुळा म्हणून महाराष्ट्रातील महिलांचे प्रसिद्‌ध उखाणे सादर केले. तसेच प्रादेशिकते द्‌वारे त्यांनी महाराष्ट्रातील विविध बोली भाषांचे सादरीकरण केले.

या कार्यक्रमामध्ये कुल क्रमांक १ मधील सर्व छात्राध्यापिकांनी महाराष्ट्राचा पारंपरिक पोशाख असलेली नऊवारी साडी परिधान केली होती व त्यांनी या नऊवारी वरील एक सांस्कृतिक रॅम्प वॉक सादर करून नऊवारीतील सौंदर्याचा अविष्कार केला. त्यानंतर यशस्वीपणे संपन्न होत असलेल्या कार्यक्रमाच्या शेवटी कुल क्रमांक-१ मधील सर्व छत्राध्यापकांनी मिळून संतांची भूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्रातील पंढरीच्या वारीचा एक अनोखा देखावा सादर करून विठूरायाच्या नामाच्या गजरात या कार्यक्रमाची सांगता केली.

## शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

(बी. एड्. प्रथम वर्ष २०२५-२७)

१) राजे शिवछत्रपती कुल-०१

२) चक्रवर्ती सम्राट अशोक कुल-०२

# "सांस्कृतिक कार्यक्रम"

### निमंत्रण पत्रिका

आपणास कळविण्यात आनंद होत आहे. की दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे दोन्ही कुलांचा 'सांस्कृतिक कार्यक्रम' आयोजित करण्यात आला आहे. तरी यासाठी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

**आयोजक/ कुल मार्गदर्शक**

1) मा. प्रा. बिजली दडपे

2) मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे

**अध्यक्ष**

मा. प्राचार्य. डॉ. रमा भोसले

### प्रमुख उपस्थिती

1) मा. प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार 2) मा. प्रा. डॉ. उज्वला डोणे

स्थळ: सरस्वती कक्ष

वेळ: सकाळी ११:१५

## शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

(बी. एड्. प्रथम वर्ष २०२५-२७)

"राजे शिवछत्रपती कुल ०१"

### ◆ कार्यक्रम पत्रिका ◆

| | |
|---|---|
| दीपप्रज्वलन, सरस्वती पूजन | मा. प्राचार्य आणि सर्व प्राध्यापक |
| मा. प्राचार्यांचे स्वागत | कुल मार्गदर्शक मा. प्रा. बिजली दडपे |
| प्राध्यापकांचे स्वागत | प्रथम वर्ष बी.एड. छात्राध्यापक |
| गणेश वंदना | तेजल भोईर व छात्राध्यापक |
| गवळण | यश पाटील व छात्राध्यापक |
| मंगळागौर | तेजल भोईर व छात्राध्यापक |
| तू आभाळ आभाळ | शिवानी चौरागडे व नितीन कवाड |
| Ramp Walk+ प्रादेशिकता | कुल १ मधील सर्व छात्राध्यापक |
| ही मायभूमी महाराष्ट्र गीत | अस्मिता बदे व प्रणिता कदम |
| कोळी नृत्य | यश पाटील तेजल भोईर व छात्राध्यापक |
| लावणी | शिवानी डोईफोडे |
| कसे होत असे वादळ गीत | जयेश नडगे |
| गोंधळ | नेहा, तेजल, शिवानी |
| तारपा नृत्य | नितीन कवाड व छात्राध्यापक |
| पोवाडा | नेहा लहाने व छात्राध्यापक |
| महाराष्ट्राची वारी | कुल १ मधील सर्व छात्राध्यापक |
| सूत्रसंचालन | स्वाती म्हैसमाळे, अस्मिता बदे |
| फोटो, व्हिडिओ | भावेश, विशाल, सुनील |

स्थळ:- सरस्वती कक्ष वेळ :- सकाळी ११:१५


GPS Map Camera
Navi Mumbai, Maharashtra, India
X4q8+fqc, Forest Colony, Panvel, Navi Mumbai, Maharashtra 410206, India
Lat 18.989126° Long 73.116915°
Friday, 12/12/2025 11:43 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Navi Mumbai, Maharashtra, India
X4q8+fqc, Forest Colony, Panvel, Navi Mumbai, Maharashtra 410206, India
Lat 18.989132° Long 73.11692°
Friday, 12/12/2025 11:44 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Navi Mumbai, Maharashtra, India
X4q8+fqc, Forest Colony, Panvel, Navi Mumbai, Maharashtra 410206, India
Lat 18.98913° Long 73.116926°
Friday, 12/12/2025 11:44 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Navi Mumbai, Maharashtra, India
X4q8+fqc, Forest Colony, Panvel, Navi Mumbai, Maharashtra 410206, India
Lat 18.989128° Long 73.116921°
Friday, 12/12/2025 11:44 AM GMT +05:30
Google








महाविद्यालयाच्या प्राचार्या मा. डॉ. रमा भोसले मॅडम, कुल क्रमांक-१ च्या मार्गदर्शक प्राध्यापिका मा. बिजली दडपे मॅडम व कुल क्रमांक-२ च्या मार्गदर्शक प्राध्यापिका मा. डॉ. नीलिमा मोरे मॅडम तसेच मा. प्रा. डॉ. डोणे मॅडम व प्रा. डॉ. सुभेदार मॅडम दीपप्रज्वलन, सरस्वतीपूजन तसेच नटराजांच्या प्रतिमेचे पूजन करताना. तसेच माननीय प्राचार्या डिजीटल पद्धतीने कुल क्रमांक-१ च्या पोस्टरचे उद्घाटन करताना.




छात्राध्यापिका नेहा लहाने, तेजल भोईर व वंदना वणवे गणेश वंदना सादर करताना.

छत्राध्यापक यश पाटील व कुल क्रमांक-१ चे इतर छात्राध्यापक गवळण सादर करताना.







छात्राध्यापिका तेजल भोईर व इतर सह छात्राध्यापिका मंगळागौर सादर करताना.

छात्राध्यापक नितीन कवाड व छात्राध्यापिका शिवानी चौरागडे ‘ तू आभाळ आभाळ’ हे गीत सादर करताना.







**कुल क्रमांक-१ च्या सर्व छात्राध्यापिका सांस्कृतिक रॅम्प वॉक सादर करताना.**

**छात्राध्यापिका अस्मिता बदे व प्रणिता कदम ‘ ही माय भूमी’ हे गीत सादर करताना.**







छात्रध्यापक यश पाटील, जयेश नडगे तसेच छात्रध्यापिका तेजल भोईर, वंदना वणवे कोळी नृत्य सादर करताना.

छात्राध्यापिका शिवानी डोईफोडे लावणी सादर करताना.







**छात्राध्यापक जयेश नडगे ‘ कसे होत असे वादळ’ हे गीत सादर करताना.**

**छात्राध्यापिका शिवानी डोईफोडे, तेजल भोईर व नेहा लहाने गोंधळ सादर करताना.**







**छात्राध्यापक नितीन कवाड व इतर छात्राध्यापक आदिवासी तारपा नृत्य सादर करताना.**

**छात्राध्यापिका नेहा लहाने व इतर छात्राध्यापक ‘ प्रताप गडाच्या पायथ्याशी खान’ हा पोवाडा सादर करताना.**







**कुल क्रमांक-१ चे सर्व छात्राध्यापक महाराष्ट्रातील पंढरीच्या वारीचा देखावा सादर करताना.**

**छात्राध्यापिका स्वाती म्हैसमाळे व अस्मिता बदे कार्यक्रमाचे प्रभावी सुत्रसंचालन करताना.**







**कार्यक्रमाच्या दिवशी कुल क्रमांक-१ चे छात्राध्यापक यश पाटील यांनी काढलेली सुंदर रांगोळी.**

**कार्यक्रमाच्या दिवशी महविद्यालयाचे छात्राध्यापक नितीन कवाड व सुनील चौधरी यांनी केलेलं सुंदर फलक लेखन.**